# प्रेसनोट

दिनांक – २२/०८/२०२३

**लोकसेवक रमेश यशवंत मौळे, वय ४५ वर्षे, सहायक लेखाधिकारी, वर्ग–३, लेखा शाखा, जिल्हा परिषद पालघर यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी घेतले ताब्यात.**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | गुन्हा नोंद पोलीस ठाणे | पालघर पोलीस ठाणे, जि.पालघर |
| ३ | कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक रमेश यशवंत मौळे, वय ४५ वर्षे, सहायक लेखाधिकारी, वर्ग–३, लेखा शाखा, जिल्हा परिषद पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | २०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | २०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | तक्रारदाराच्या ठेकेदार मित्राला ग्रामपंचायत कासटवाडी, ता.जव्हार पैकी रामनगर, जि.पालघर येथे नळ पाणीपुरवठा करणे या कामाचा कार्यारंभ आदेश जिल्हा परिषद पालघर कार्यालयाकडून देण्यात आलेला होता. त्या कामासाठी मनुष्यबळ पुरविणे, काम पुर्ण झाल्यावर कामाच्या बिलासंदर्भात आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करून घेवून बिलासाठी जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यासाठी तक्रारदार यांना ठेकेदाराने अधिकारपत्र दिले होते.<br>त्याप्रमाणे तक्रारदार हे दिनांक १८/०८/२०२३ रोजी वित्त विभाग, लेखा शाखा, जिल्हा परिषद पालघर येथे जावून तेथील सहायक लेखाधिकारी श्री.रमेश यशवंत मौळे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे नळ पाणीपुरवठा करण्याच्या कामाचे बिल मंजुर करण्यासाठी २०००/– रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपीत लोकसेवक यास लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक २१/०८/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली आहे.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २२/०८/२०२३ रोजी आरोपी लोकसेवक यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामाचे अनुषंगाने २०००/– रूपये लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम लागलीच दिनांक २२/०८/२०२३ रोजी १४:५२ वाजताचे सुमारास वित्त विभाग, जिल्हा परिषद कार्यालय पालघर येथे त्यांचे कार्यालयात तक्रारदार यांचेकडून आरोपी लोकसेवक यांनी स्विकारली असता नमूद आरोपी लोकसेवक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर, पालघर प. ४०१४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9423884745
9082645711

(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

Scanned by CamScanner